प्रेस नोट　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक ०१/०६/२०१८

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २४/२०१८ |
| कलम | कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालय | देवराम शिवराम पाटील, वय ५४ वर्षे, धंदा नोकरी, पद – राज्यकर सहाय्यक विक्रीकर आयुक्त, वस्तू व सेवा कार्यालय, बीकेसी, बांद्रा (पू), मुंबई ५१ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ५०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ४५,०००/– (तडजोडीअंती) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे युनिसेक्स सलुन आहे. नमुद सलुनचा सन २००६ पासुन प्रोफेशनल टॅक्स भरलेला नसल्या बाबत तक्रारदार यांना लोकसेवक डी. एस. पाटील यांनी नोटीस पाठविली होती. सदर नोटीसचे अनुषंगाने टॅक्स बाबत चौकशी करण्या करीता तक्रारदार यांनी लोकसेवकाची त्यांचे कार्यालयात भेट घेतली. लोकसेवक यांनी तक्रारदार यांना सन २००६ पासुनचा टॅक्स न भरता सन २०१४ ते २०१८ या कालावधीचा टॅक्स रूपये १४,६५०/– भरण्याचा सल्ला देवून तक्रारदाराला तशी नोटीस दिली व टॅक्स कमी केल्या बददल तक्रारदाराकडे स्वत:साठी रूपये ५०,०००/– इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली.<br><br>तक्रारदाराला लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात तक्रार दिली. तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लोकसेवकाने रूपये ४५,०००/– इतक्या रकमेच्या लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानुसार केलेल्या सापळा करवाई दरम्यान आरोपी लोकसेवक देवराम शिवराम पाटील यांना तडजोडीअंती तक्रारदारा कडून रूपये ४५,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ३०
टोल फ्री क. १०६४, दुरध्वनी क. ०२२–२४९२१२१२
फॅक्स क. ०२२–२४९२२६१८
वेबसाईट – acbmaharashtra.gov.in ईमेल– acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल – addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक – www.facebook.com-Maharashtra ACB
मोबाईल ॲप – www.acbmaharashtra.net
व्हॉट्स ॲप कमांक – ९९३०९९७७००

1.6.18
( एम एन मुगुटराव )
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग